सारांश :-

मुख्यत: वार्ता तसेच मते, जाहिराती, रंजक व अन्य पूरक मजकूर यांचा समावेश असलेले, ठरलेल्या वेळी नियमितपणे छापून वितरित केले जाणारे प्रकाशन म्हणजे वृत्तपत्र होय.

अठराव्या शतकात ब्रिटिश राज्यकर्त्यांबरोबर ख्रिश्चन मिशनरीही भारतात आले. महाराष्ट्रात तत्कालीन परिस्थितीत शहरे थोडी व खेडी जास्त अशी स्थिती होती. हिंदू समाज असंख्य जाती उपजातींनी दुभंगला होता. बहुजन समाज अज्ञान, दारिद्रय, रूढी—परंपरा ह्यांनी पिडलेला होता. अशा परिस्थितीत ख्रिश्चन धर्मगुरू धर्मातरांचे कार्य करीत होते.

जाधव बबन भिवसेन

संशोधन मार्गदर्शक: टि.म.वि. पुणे,
शिक्षणमहर्षी दादासाहेब लिमये महाविद्यालय
,कळंबोली, नवी मुंबई,

'ज्ञानोदय' या नियतकालिकाचे मुल्यमापन

प्रस्तावना :-

अहमदनगर शहरात ज्ञानोदय नियतकालिक सुरू झाले. ते इ. स. १८४२ ते १९४१ असे शंभर वर्षाहून अधिक काळ चालले. ख्रिस्ती मराठी मंडळींनी ते चालविले. ब्रिटिश राजवटीच्या आगमनापासून स्वातंत्र्यपूर्वकाळातील महाराष्ट्राची सांस्कृतिक, सामाजिक, धार्मिक जडणघडण समजण्यासाठी ज्ञानोदय महत्त्वाचे नियतकालिक आहे. हा शोधनिबंध तयार करताना ज्ञानोदयाची सर्व अंक न पहाता डॉ. मोरजे यांनी संपादित केलेल्या 'ज्ञानोदय लेखनसारसुची' या ग्रंथातील निवडक सूचीचा अभ्यास करून मुल्यमापन केले आहे.

धर्मप्रसार :

अमेरिकन बोर्ड १८१०मध्ये स्थापन झाले...चारशे साहेब व मडमा देवाचे काम करीत आहेत. १५० ख्रिस्ती मंडळया व २९ हजार ख्रिस्ती लोक आहेत. शाळा, पाठशाळा, छापखाने यांच्या वतीने बेसुमार काम चालते. अहमदनगर विभागात एकूण ११ मंडळया काम करतात. मंडळीत ३१९ ख्रिस्ती आहेत. २५१ लेकरांना बाप्तिस्मा देण्यात आला. नगर मिशनची स्थापना १८३१ मध्ये झाली.

महाराष्ट्रातील यात्रांसंबंधी ज्ञानोदयची भूमिका :

पंढरपुरची यात्रा : महाराष्ट्राच्या अध्यात्मिक राजधानी व शतकानुशतके पवित्र क्षेत्र असलेल्या पंढरीचे वर्णन त्यांनी केले. ''...तेथे (पंढरपूर) जाण्याचा माझा उद्देश हा की आपल्या अज्ञानी यात्रेकरूंना जगाला तारणारा जो प्रभू येशु त्यांचे शुभ वर्तमान सांगावे. मी तेथील लोकांची स्थिती पाहू लागलो ते विलक्षण वेडे वाकडे चमत्कार करीत होते. एकजण हातात टाळ घेऊन वाजवीत कंबर वाकवून तोंडाने 'रामकृष्ण हरे—रामकृष्ण हरे' असे म्हणत घिरटया घालत होता...माणसे अगदी चेंगरून जातात 'मेलो रे मेलो ओरडतात' कुणी हात मोडला म्हणतो कुणी पाय मोडला म्हणतो! देवळात डोक्यावर तोंबे मारतात. कित्येकांचे डोके फुटून रक्तबंबाळ झाले होते... लाखो लोकांच्या गर्दीमुळे व जनावरांचे शेण वगैरे पायाखाली तुडविले गेल्यामुळे दुर्गंध सुटतो. त्याचा दर्प सुटताच ओकारी येते अशी घाण येथे येणारे लोक करतात. माझी परमेश्वराला ही प्रार्थना आहे की सर्व लोकांनी असल्या अज्ञानांतून व श्रमातून सुटून खऱ्या देवाची भक्ती आत्म्याने व सत्यतेने करू लागावी व प्रभू येशूच्या पुण्याने तारण पावावे.'' जत्रामुळे कोणतेही प्रश्न, समस्या सुटत नाहीत असे रे. व्हैट यांनी पंढरपूर यात्रेबाबत म्हटले आहे. यावर ज्ञानोदयकर्त्याचे लेखन असे की, मूर्तिपूजा, यात्रेची गर्दी, त्याकाळातील पंढरपूरातील दुर्गंधी, रोग, वगैरे पाहाता ख्रिस्ती सरकारने पंढरपूरच्या देवस्थानास सालीना मदत देणे ही मोठी लज्जास्पद गोष्ट आहे.
१५ मे १८५८च्या ज्ञानोदयात लासूरच्या यात्रेचेही वर्णन करण्यात आले आहे की, देवीच्या भक्तीने कुणी दारूबाज, कुणी रांडबाज, कुणी आळशी, कुणी रोगी होतो म्हणून तिची भक्ती सोडा.

विळद येथे म्हसोबाच्या यात्रेत पुरूष व स्त्रिया गाणी म्हणत व सोंगे आणीत. ती इतकी अचकट विचकट होती की ज्या बाईला पाप कसे करावे हे माहीत नसेल तिने एकदा हे कीर्तन पाहिले म्हणजे ती लागलीच पाप करण्यास हुशार होईल.

ब्राह्मणी येथील देवीच्या यात्रेत कुणी पोळीचा नैवद्य देतात. काही लोक पशुबळी देतात. कुठलाही दगड आणून मग पाथरवटाला बोलावून त्यावर आकार काढले व शेंदूर फासला की झाला देव व मग लोक अशा मुर्तीला पूजतात. प्रभू येशू हा नीतिमत्त्वाचा सूर्य असून त्याची कोणालाही ओळख नाही म्हणून लोक अंधारात चाचपडत आहेत. याचबरोबर कोल्हापूर, सोलापूर, भीमाशंकर, मांडवगण (अ. नगर) येथील जत्रांचाही उल्लेख आलेला आहे.

शिमग्याच्या सणाला विरोध ज्ञानोदयाने केला. शिमग्याच्या दिवशी शाळा चालू ठेवण्याचा आग्रह धरला. नारळी पौर्णिमेला समुद्रास नारळे अर्पण करतात. यावर ज्ञानोदय म्हणते, एकंदरीत धर्मातही ठकबाजी, लबाडी व फसवणूक चालते. नासका नारळ देऊन समुद्राची थट्टा मस्करी केल्यावर तो कसला आशीर्वाद देणार आहे? शिक्षणाच्या अभावामुळे अंधश्रद्धा होत्या.

शिक्षणसंस्था विषयी :

डायरेक्टर हावर्ड यांनी १८५९—६० चा विद्याखात्याचा रिपोर्ट ज्ञानोदयमध्ये छापून आला होता. 'गेल्या ५ वर्षात विद्येची बरीच बढती झाली. सन १८५५ त २९१ शाळा व २३,६८१ विद्यार्थी होते, तर १८६० त ७६१ शाळांत ४४,१६६ विद्यार्थी आहेत. ... संस्थानी शाळा ४१ वरून १२२ वर गेल्या. मिशनची संख्या तर ३५२८ शाळात ९१,३३० विद्यार्थी एवढी प्रचंड झाली... एकूण प्रजेच्या १३ टक्के विद्यार्थी शाळांत शिकत आहेत'.

विज्ञान, संशोधन :

अमेरिकेतील विविध शोधांच्या बातम्या आलेल्या आहेत. आगीवर चालणारा नवीन नांगर, काचेवर अक्षरे उमटविण्याची युक्ती, घड्याळ, बोरघाटातून जाणारी आगगाडी, शिवण्याचे यंत्र, विजेची माहिती, सुक्ष्मदर्शक यंत्र अशा वैज्ञानिक उपकरणांवर व संशोधनावर माहिती येत असे. तसेच प्राणी, पशुपक्षी यांचीही माहिती येत

असे.

सरकारी कारभार :

ज्ञानोदयामध्ये अनेक जाहीरनामे प्रसिध्द् झाले आहेत. सरकारी राज्यकारभाराविषयी माहिती येत असे. प्राप्तीकर सरकारने लागू केल्यानंतर त्याविषयी बातम्या ज्ञानोदयात आलेल्या दिसून येतात. १८५७च्या बंडाविषयी अनेक बातम्या आलेल्या होत्या. ब्रिटिशांविरूध्द् भिल्लांनी केलेल्या उठावाच्या, नगरच्या भागोजी नाईकाविषयीही उल्लेख आलेले आहेत. विविध भागातील चांगल्या कायद्यांची माहिती ज्ञानोदयामध्ये येत असे. आरोग्याविषयी माहिती येत असे. दुष्काळाविषयी वेळोवेळी माहिती आलेली आहे. अहमदनगर, विजापूर, मुंबई या शहरांचे वर्णने ज्ञानोदयामध्ये येत असत. पेंकिग, लंडन, सिंगापूर या शहरांविषयीही माहिती आलेली होती.

लोकस्थिती :

अहमदनगर जिल्ह्यातील कोकमठाण व संवत्सर या गावाचे लोक दरवर्षी लढाई खेळतात. या वैशाखी लढाईत दोन्ही गावाचे लोक नदीच्या काठावर उभे रहावून गोफणीने दगड मारतात. त्यामुळे अनेकजण गंभीर जखमी होत. दागिने घातल्याने अनेकांचे खुन होतात. त्यामुळे दागिने घालण्याची पध्द्त बंद करावी असे सुचविण्यात आले होते.

स्त्री विषयक प्रश्न व ज्ञानोदयाची भूमिका :

एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्रातील आधुनिक युगाला प्रारंभ झाला. आधुनिक युगात सामाजिक अभिसरण सुरू झाले. स्त्री विषयक समस्या तत्कालीन नियतकालिकांतून व्यक्त झाल्या.स्त्री चळवळींना आकार देण्यास या नियतकालिकांमधील प्रबोधनाचा उपयोग झाला. स्त्री विषयक प्रश्न ज्ञानोदय या नियतकालिकाने एकोणिसाव्या शतकात व्यवस्थित हाताळले.

बालविवाह–बालमृत्यू–बालहत्या : बालविवाह प्रथेचे तोटे ज्ञानोदयकारांनी समाजाला पटवून दिले. बालविवाहामुळे स्त्रीला भोगाव्या लागणाऱ्या परिणामांची जाणीव करून दिली.

स्त्री शिक्षण : समाजिक जागृतीच्या दृष्टीकोनातून ज्ञानोदयातून स्त्री शिक्षणावर सतत भर दिलेला दिसून येतो. स्त्री शिक्षणाची आवश्यकता पटवून दिली. ज्ञानोदयातून स्त्री शिक्षणाकरिता सुरू असलेले प्रयत्न, स्वकीय समाजसुधारकांनी स्त्री शिक्षणाचे केलेले प्रयोग याची माहिती मिळते. स्त्री शिक्षणासंदर्भातील तत्कालीन चुकीच्या समजूती दूर करण्याचे प्रयत्न करण्यात आले.

विधवा प्रश्न : बालविवाहामुळे, जरठकुमारी विवाहामुळे बालविधवा प्रश्न निर्माण होत असे. ब्राह्मण, मराठा व तत्सम वरिष्ठ जातीत बालविधवांचे जिणे अतिशय दयनीय होते. एकोणिसाव्या शतकात विधवांना माणूस म्हणून जीवन जगण्यासाठी प्रयत्न करण्यात येऊ लागले. समाजाच्या भीतीने प्रारंभी काही पुनर्विवाह अत्यंत गुप्ततेने पार पडत असत. त्याबाबतचे काही उल्लेख ज्ञानोदय या वृत्तपत्रात (१८४२ ते १८६०) मिळतात. विधवांच्या पुनर्विवाहाबाबत अनेक उल्लेख येत. बंगालच्या तुलनेत मुंबई इलाख्यात पुर्नर्विवाहाचे प्रमाण कमी होते. विधवांकडून कुव्यवहार झाल्यास त्यांचा पुनर्विवाह करून त्यांना ख्रिस्ती धर्मात घेत असत. त्यामुळे लोक म्हणत ख्रिस्ती लोक वाईट चालींच्या लोकांना आश्रय देतात. रंगुबाई व बाळाजी रघुनाथ या ब्राह्मण जोडप्याच्या पुनर्विवाहाबाबत रे. विष्णु भास्कर यांनी अशीच भूमिका घेतली होती.

मुल्यमापन :

ज्ञानोदय हे मिशनऱ्यांनी चालविलेले नियतकालिक असल्यामुळे धर्मप्रसाराला पूरक कार्य करणे हे त्याचे प्रमुख ध्येय होते. हे करत असताना समाज जीवनाची चिकित्सा करणे आणि समाजसुधारणेला चालना देणे ही सुध्द्ा ज्ञानोदयाची उदिद्ष्टे होती.

समाजप्रबोधन आणि रूढीभंजन ही अत्यंत अवघड कामे ज्ञानोदयाने केली. ज्ञानोदयातील प्रबोधनामुळे सामाजिक जागृतीस चालना मिळून लोकांचा दृष्टीकोन अधिक व्यापक होण्यास हातभार लागला. सामाजिक वैगुण्यावर ज्ञानोदयाने टीका केली. शिक्षणाच्या प्रसारासाठी कार्य केले. पाश्चात्य तत्वज्ञान तंत्रविद्या व शास्त्रीय शोधांची माहिती वाचकांना व्हावी ही ज्ञानोदयाची उद्दीष्टे होती. सरकारी कारभाराविषयीही माहिती वेळोवेळी दिली आहे. मात्र हे करत असताना ख्रिस्ती धर्मतत्वांचाही प्रचार ज्ञानोदयाने केलेला दिसून येतो.

ज्ञानोदयाने महाराष्ट्राच्या सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक प्रबोधनामध्ये महत्त्वाचा वाटा उचलला. अव्वल इंग्रजी अमदानीतील महाराष्ट्राच्या जडणघडणीचे दर्शन ज्ञानोदयातून होते. शिक्षणाबद्दलची अनास्था, अंधश्रद्धा व चूकीच्या परंपरा, ब्राह्मणांचे अवास्तव वर्चस्व, स्त्रियांची पिळवणूक, विधवांची समस्या, जातिभेद व अस्पृश्यता यासारख्या विषयांवर ज्ञानोदयाने आपली मते मांडून समाज प्रबोधनाचे कार्य केले आहे. अनेकदा

बोधकथा, नीतीकथाही दिल्या आहेत. जातिभेद व सामाजिक विषमता यावर ज्ञानोदयाने प्रचंड टिका केलेली आहे.

ज्ञानप्रसार व विचारप्रवर्तक ज्ञानोदयाचा सामाजिक सुधारणा हा कणा होता. ज्ञानोदयाला फक्त अहमदनगर, मुंबई, पुण्यासारख्या शहरातील बातम्यांची मर्यादा नव्हती. महाराष्ट्राच्या सीमा ओलांडून बंगाल, पंजाब या राज्यांतील मुख्य घडामोडीचा वेध घेणाऱ्या या नियतकालिकाने युरोप व अमेरिका खंडातील स्त्रियांविषयी माहिती देऊन येथील लोकांपुढे आदर्श ठेवला. ज्ञानोदयामध्ये समकालीन व परदेशी स्त्रीचे चित्र रेखाटलेले दिसून येते. परदेशातील आंधळया मुलीच्या शिक्षणाची माहिती, परदेशी स्त्रियांच्या वर्तमानपत्र वाचनाची गोडी या बाबींवर प्रकाश टाकला आहे. अमेरिकेतील स्त्री शिक्षण यांसारखे लेख लिहिले आहेत. तत्कालीन काळात साक्षरतेचा अभाव असताना व्यावसायिक स्वरूपाच्या शिक्षणाचे ज्ञानोदयकारांनी महत्त्व पटवून दिले आहे.

महाराष्ट्रातील पुरोगामी विचारांच्या चळवळीचे प्रणेते असलेल्या महात्मा फुले यांच्या कार्याचा व विचारांचा प्रसार करण्याचे काम ज्ञानोदयाने केले आहे. त्याचप्रमाणे भाऊ दाजी लाड, नाना शंकरशेठ, लोकहितवादी, बंगालमधील राजा राममोहन राय, ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्याही कार्याची माहिती आलेली आहे.

मर्यादा : ज्ञानोदय हे धार्मिक नियतकालिक असल्याने ज्ञानोदयमधील वैचारिक मांडणी ही ख्रिश्चन धर्माच्या मुल्य चौकटी अंतर्गतच झालेली दिसून येते. ज्ञानोदय हे धर्मनिष्ठ नियतकालिक होते. कॅथेरीन मेयो यांचे 'मदर इंडिया' हे पुस्तक १९२७ साली प्रसिध्द् झाले. त्यावेळी या पुस्तकामुळे खूप खळबळ उडाली होती. या पुस्तकात भारताचा सामाजिक मागासलेपणा अगदी भडक रीतीने मुद्दाम वेशीवर टांगण्यात आला होता. उद्देश हा की, स्वातंत्र्य प्राप्त करून घेण्यासाठी भारत कसा नालायक आहे हे सिध्द् व्हावे. त्याप्रमाणे ज्ञानोदयाने ख्रिस्ती धर्मप्रसारासाठी प्रयत्न केलेले दिसून येतात. येथील यात्रा, उत्सव, मुर्तीपूजा यावर टीका केलेली दिसून येते. ख्रिश्चन धर्म, इंग्लड, अमेरिका याविषयी कायम चांगले लिहिण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. विष्णुबावा ब्रह्मचारी यांची मते धर्माच्या विरूध्द् होती असे मत ज्ञानोदयाने व्यक्त केले आहे. तरी त्याचे कार्य समाजसन्मुख होते. प्रबोधन काळात त्याची कामगिरी महत्त्वाची होती.

भारतीय हिंदू समाजव्यवस्थेवर स्त्री विषयक सुधारणावाद हा ख्रिस्ती धर्मास धक्का न लावता मांडलेला व मर्यादित स्वरूपाचा होता असे म्हणता येईल. धार्मिक मर्यादेप्रमाणेच ह्या कालखंडाची मर्यादा देखील ज्ञानोदयावर दिसून येते. ज्ञानोदयाला एक सुविद्य पत्नी, आदर्श माता अशा प्रकारची स्त्री त्यांना अपेक्षित आहे. कुटुंबाचे समाजातील स्थान वाढवावे व म्हणून तिच्यात सुधारणा होण्याची गरज आहे. ज्ञानोदयातून व्यक्त होणारा सुधारणावाद हा काळाच्या पुढे नाही. त्याचप्रमाणे ज्ञानोदयामधील लिखाणातून क्रांतीकारी विचारही दिसून येत नाही. पुरूषप्रधान संस्कृतीला धक्का न लावता आपली पारंपारिक भूमिका स्त्रीने अधिक चांगल्या रीतीने पार पाडावी या दृष्टीने हा सुधारणावाद दिसून येतो. एकोणिसाव्या शतकातील स्त्रीविषयक सुधारणावादातील पुरूष पुढाकाराप्रमाणे ज्ञानोदयातील लेखनामध्येही तो दिसून येतो. भारतीयत्व व ख्रिश्चन वाद ज्ञानोदयातून दिसून येतो.

ज्ञानोदय हे ख्रिस्ती मिशनऱ्यांनी चालवले तरी येथील संस्कृतीशी त्यांनी एकरूपता साधली होती. जरी ख्रिस्ती धर्म हा भारताबाहेर निर्माण झाला असला तरी देखील ज्ञानोदयाशी संबंधित ख्रिस्ती मिशनरी व ख्रिस्ती धर्मांतरित एतद्देशियांची बांधिलकी भारतीय समाजाशी होती. ते स्वत:ला येथील समाजजीवनाचा एक भाग मानत होते.

स्त्री जीवनाचे विविध पैलू आणि स्त्रियांच्या विविधांगी समस्या यांची दखल ज्ञानोदयाने सातत्याने घेतलेली होते. म्हणूनच एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रामधील स्त्रीमुक्तीच्या संदर्भात ज्ञानोदयाची भूमिका अर्थपूर्ण म्हटली पाहिजे. तत्कालीन समाजाची मानसिक घडण बदलण्याकरिता ज्ञानोदयाची प्रेरणा ही निश्चित उपकारक झाली. आजच्या स्त्रीमुक्ती चळवळीशी काहीसे नाते सांगु शकेल अशी प्रेरणा ज्ञानोदयात दिसून येते. एकोणिसाव्या शतकामध्ये जरी स्त्रीवादी चळवळ म्हणून तिचे अस्तित्व नसले तरीही आजच्या स्त्रीवादी चळवळीची पार्श्वभूमी ही एकोणिसाव्या शतकाने घडवली. स्त्री मुक्ती चळवळीस पायाभूत असलेली समाजजागृती घडवून आणण्यास ज्ञानोदयाचे कार्य उपयुक्त ठरलेले दिसते. शिक्षित स्त्री, मातृत्वाची जबाबदारी सांभाळणारी स्त्री, आदर्श पत्नी, त्याचप्रमाणे पुनर्विवाह करू पहाणारी विधवा, अशी स्त्रीची अनेक रूपे ज्ञानोदयात पहावयास मिळतात. एकोणिसाव्या शतकातील प्रयोगक्षम कालखंडात नव्या जाणिवांची निर्मिती करणे आवश्यक होते. त्यात ज्ञानोदयाला यश आले असे म्हणता येईल.

संदर्भ व तळटीपा :

१.जोशी बी. आर. व इतर (संपा.), डायमंड सामाजिक ज्ञानकोश खंड २, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २००७, पृ. १५१५.
२.ज्ञानोदय, पुस्तक १९, अंक १८, १५सप्टेंबर १८६०, मुंबई, पृ. २७५—२७९.
—मोरजे गंगाधर(संपा.), ज्ञानोदयलेखनसारसूची, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९८९, पृ. ४०० वरून उद्धृत.
३.ज्ञानोदय, पुस्तक १८, अंक ९, २ मे १८५९, मुंबई, पृ. १३०—१३१.
—मोरजे गंगाधर(संपा.), पूर्वोक्त पृ. १९५ वरून उद्धृत.
४.जोशी सुरेश (संपा.), इतिहास संशोधन प्रदीप, वर्ष ४ थे अंक १२ ते १५, मे १९७९ ते फेब्रुवारी १९८०, पृ. २७—२८ व ज्ञानोदय, पुस्तक १७, अंक १८, २२ सप्टेंबर १८५८, पृ. २७८—२७९.

—मोरजे गंगाधर(संपा.), पूर्वोक्त पृ. १०६ वरून उद्धृत.
५.ज्ञानोदय, पुस्तक २०, अंक ५, १ मार्च १८६१, मुंबई, पृ. ६६—७०.
—मोरजे गंगाधर(संपा.), पूर्वोक्त पृ. ४७२ वरून उद्धृत.
६.जोशी सुरेश (संपा.), पूर्वोक्त, पृ. २८—२९.
७.जोशी सुरेश (संपा.), पूर्वोक्त, पृ. २९.
८.जोशी सुरेश (संपा.), पूर्वोक्त, पृ. २९.
९.ज्ञानोदय, पुस्तक २२, अंक ५, २ मार्च १८६३, मुंबई, पृ. ८८—९०.
—मोरजे गंगाधर(संपा.), पूर्वोक्त पृ. ७५४ वरून उद्धृत.
१०.ज्ञानोदय, पुस्तक २०, अंक १४, १५ जुलै १८६१, मुंबई, पृ. २२०—२२३.
—मोरजे गंगाधर(संपा.), पूर्वोक्त पृ. ५२७ वरून उद्धृत.
११.गर्गे स. मा., भारतीय समाजविज्ञान कोश, खंड ३, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, द्वितीयावृत्ती २००७, पृ. २८०.
१२.ज्ञानोदय, पुस्तक १७, अंक २०, १५ ऑक्टोबर १८५८, मुंबई, पृ. ३१८—३१९.
—मोरजे गंगाधर(संपा.), पूर्वोक्त पृ. १२१ वरून उद्धृत.
१३.ज्ञानोदय, पुस्तक २०, अंक १४, १५ जुलै १८६१, मुंबई, पृ. २३५—२३८.
—मोरजे गंगाधर(संपा.), पूर्वोक्त पृ. ५३१ वरून उद्धृत.
१४.झा मनोरंजन, (अनु. कऱ्हाडकर रघुनाथ), कॅथेरियन मेयो आणि भारत, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९७७, मलपृष्ठ.
१५.ज्ञानोदय, पुस्तक १८, अंक १३, १ जुलै १८५९, मुंबई, पृ. २०३—२०५.
—मोरजे गंगाधर(संपा.), पूर्वोक्त पृ. २२७ वरून उद्धृत.